## ५. लेखा शाखा :

लेखा शाखेत पुणे, अहमदनगर, सोलापूर, या तीन जिल्ह्यांचे बजेट (अंदाजपत्रक) एकत्रित करुन मा.शिक्षण संचालनालय (माध्यमिक व उच्च माध्यमिक) पुणे यांचेकडे सादर केले जाते. अनुदान उपलब्ध झाल्यानंतर ते संबंधित कार्यालयांना वितरित करण्यात येते. या कार्यालयाच्यां अधिनस्त असलेल्या तीन जिल्ह्यांतील दुय्यम कार्यालयांना वितरित करण्यात येते

या कार्यालयामार्फत खालील लेखाशीर्षांचा मासिक अधिनस्त तिन्ही जिल्हयांचा एकत्रित खर्च अहवाल मा.शिक्षण संचालनालय (माध्यमिक) पुणे यांना पाठविण्यात येतो.

योजनांतर्गत योजना :-

१. अशासकीय माध्यमिक शाळांना,सहाय्यक अनुदान नवीन अशासकीय माध्यमिक शाळा लेखशीर्ष- २२०२३३६१ **(Plan)**
२. इयत्ता ५ वी ते ७ वी विकास व विस्तार (माध्यमिक शाळा जादा तुकडया) लेखाशिर्ष २२०२३३७९ **(Plan)**
३. उच्च माध्यमिक शिक्षणाचा विकास (कनिष्ठ महाविदयालया) अतिरिक्त वर्ग २२०२०५११ **(Plan)**
४. जिल्हा सैनिकी शाळा, लेखाशिर्ष- २२०२०५०२ **(Plan)**
५. पुणे विभागातील सर्व कनिष्ठ महाविद्यालयातील सेवानिवृत्त कर्मचा-यांचे सेवानिवृत्ती वेतन प्रस्ताव छाननी करणे व महालेखापाल मुंबई यांचेकडे सादर करणे त्याअनुषंगाने सुधारित सेवानिवृत्ती वेतन प्रस्ताव पहाणे.

६. चारमाही सुधारित अंदाजपत्रक सन - व - अर्थसंकल्पिय अंदाजपत्रक
प्रायोगीक तत्वावर वेतनाची अंदाजपत्रक हे ऑनलाईन घेतलेले आहे.

शिक्षणाधिकारी प्राथमिक/माध्यमिक यांच्याकडून राबविल्या जाणा-या योजनेंची झालेल्या खर्चाचे आकडे योजनेनिहाय एकत्रित करुन (कार्यक्रम अंदाजपत्रक) पुस्तिका तयार करण्यासाठी माहिती संचालनालय माध्यमिक/प्राथमिक यांना सादर करणे.

कार्यबळ गट समिती :-

१. चुकीची वेतन निश्चिती दुरुस्ती करणे
२. इमारत भाडे व थकित इमारत भाडे प्रस्ताव तपासणी करणे
३. वेतन देयके, वेतन पथ माध्य/प्राथ/पुणे/सोलापूर/अमदनगर यांचे कडून आलेल थकित वेतन देयके तपासून कार्यबळ गट समितीमार्फत मान्य करणे.

शिक्षणाधिकारी प्राथमिक/माध्यमिक यांच्याकडून राबविल्या जाणाया योजनेंची झालेल्या खर्चाचे आकडे योजनेनिहाय एकत्रित करुन (कार्यक्रम अंदाजपत्रक) पुस्तिका तयार करण्यासाठी माहिती संचालनालय माध्यमिक/प्राथमिक यांना सादर करणे.

पुणे विभागात असलेल्या संलग्न कार्यालयांची घरबांधणी, मोटारसायकल, संगणक खरेदी प्रस्ताव मान्यतेसाठी पाठविणे व मान्य होऊन आल्यानंतर संबंधितांना आदेश पाठविणे.